**<u>ठळक बातम्या</u>**

- रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यात नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक

- भारतीय रिझर्व्ह बँकेकडून रेपो दरामध्ये पाव टक्का कपात

- वक्फ मालमत्तांच्या नोंदणीसाठी सुरू झालेल्या उमीद या पोर्टलवर दीड लाखापेक्षा जास्त मालमत्तांची नोंदणी

**आणि**

- उत्तराखंडच्या चंपावत जिल्ह्यात वाहन दरीत कोसळून झालेल्या अपघातात ५ जण ठार, ५ जखमी

**<><><><><>**

भारताच्या दौऱ्यावर आलेले रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यात नवी दिल्लीत हैदराबाद हाऊस इथं उच्चस्तरीय बैठक सुरु आहे. या बैठकीत दोन्ही नेते द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेणार असून क्षेत्रीय आणि परस्पर हिताच्या आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत. याशिवाय व्यापार, वित्त, आरोग्यसेवा, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि माध्यम क्षेत्राशी संबंधित सामंजस्य करार देखील होणार आहेत.

तत्पूर्वी, तेविसाव्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी पुतिन यांचं काल नवी दिल्लीत आगमन झालं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. पुतीन यांचं आज सकाळी राष्ट्रपतीभवनात स्वागत करण्यात आलं. पुतीन यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पुतीन यांचं स्वागत केलं. लष्कराच्या तिन्ही दलांचे प्रमुख, दोन्ही देशांचे प्रमुख मंत्री आणि अधिकारी या प्रसंगी उपस्थित होते. त्याआधी पुतीन यांनी नवी दिल्लीत राजघाटावर महात्मा गांधी यांच्या समाधीस्थळी जाऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दरामध्ये पाव टक्का कपात केली आहे. यामुळे आता नवीन रेपो दर पाच पूर्णांक २५ शतांश टक्के झाला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज चालू आर्थिक वर्षाचा पाचवा पतधोरण आढावा जाहीर केला, त्यावेळी ही घोषणा केली. महागाईचा कमी झालेला दर आणि वाढलेली मागणी यांच्या आधारावर ही कपात करण्यात आली आहे. यामुळे गृहनिर्माण, वाहन आणि व्यावसायिक कर्जांसह विविध कर्ज स्वस्त होण्याची अपेक्षा आहे. याशिवाय इतर प्रमुख व्याजदरांपैकी स्थायी ठेव सुविधा दर आता ५ टक्के झाला असून सीमांत स्थायी सुविधा दर आणि बँक दर ५ पूर्णांक ५ दशांश टक्के झाला आहे. पतधोरण आढावा समितीनं यावेळी देखील तटस्थ भूमिका कायम राखल्याचं मल्होत्रा यांनी सांगितलं. रिझर्व्ह बँकेनं आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी सकल देशांतर्गत उत्पन्न म्हणजेच जीडीपी चा विकास दर ६ पूर्णांक ८ दशांश टक्क्यांवरुन ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहील असा अंदाज व्यक्त केला आहे. तर याच कालावधीसाठी महागाईचा अंदाज मागील २ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांवरून २ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे.

<><><><><>

तामिळनाडूत मदुराई इथल्या मंदिरात दिवे लावण्याच्या वादावरून द्रमुक सदस्यांनी केलेल्या निषेधानंतर लोकसभेचं कामकाज दुपारी बारा वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. सकाळी ११ वाजता लोकसभेत नियमित कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा विरोधी पक्ष सदस्यांनी हौद्यात उतरून या प्रकरणावर घोषणाबाजी करायला सुरुवात केली. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून सरकारचा त्याच्याशी काहीही संबंध नसल्याचं सांगत सभापती ओम बिर्ला यांनी विरोधकांना आपापल्या जागी परतण्याचं आवाहन केलं. तरीही विरोधकांची घोषणाबाजी चालूच राहिल्यानं बिर्ला यांनी दुपारी १२ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. राज्यसभेतही या प्रकरणाचे पडसाद उमटले असून द्रमुकसह इतर विरोधी पक्ष सदस्यांनी सभात्याग केला.

तत्पूर्वी, केंद्र सरकारकडून आरोग्याशी संबंधित पायाभूत सुविधांसाठी मिळणाऱ्या निधी वापर राज्य सरकारं करत नसल्याचा आरोप केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी आज केला. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नांना ते उत्तर देत होते. केंद्र सरकारनं विविध राज्य सरकारांना या सुविधांसाठी ६४ हजार कोटी रुपये निधी दिला

असला तरी त्यांनी फक्त ३० हजार कोटी रुपये खर्च केले आहेत, असं नड्डा आपल्या उत्तरात म्हणाले.

<><><><><>

देशात रेल्वे अपघातांच्या संख्येत ९० टक्के घट झाल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. २००४ ते २०१४ यादरम्यान देशात १७१ रेल्वे अपघात झाले होते, मात्र सरकारच्या विविध उपाययोजनांमुळे त्यांचं प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. अपघातांमागच्या मूळ कारणांचा अभ्यास करून त्यावर तोडगा काढण्याचं काम सरकार करत आहे, स्वदेशी बनावटीचं कवच हे तंत्रज्ञान यासाठीच विकसित केलं आहे, असंही ते म्हणाले. देशात धावणाऱ्या जवळपास २५ हजार रेल्वेगाड्यांपैकी ८० टक्के गाड्या वेळेवर धावतात, याकडेही त्यांनी लक्ष वेधलं.

<><><><><>

देशात मोबाईल फोन आणि संगणकाच्या सहाय्यानं सायबर गुन्हे करण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याचं राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या आकडेवारीत आढळून आलं आहे. २०२१ च्या तुलनेत २०२३ मध्ये या प्रकरणांमध्ये ३३ हजारांनी वाढ झाली आहे. देशात विशेषतः हरयाणा, पंजांब आणि हिमाचल प्रदेशमध्ये या गुन्ह्यांचं प्रमाण अधिक आहे.

<><><><><>

वक्फ मालमत्तांची नोंदणी करण्यासाठी सुरू झालेल्या उमीद या पोर्टलवर एक लाख ५१ हजारांपेक्षा जास्त मालमत्तांची नोंदणी करण्यात आली आहे, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. ते आज नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलत होते. वक्फ कायदा केल्यानंतर हे पोर्टल सुरू करण्यात आलं होतं आणि संबंधितांना वक्फ मालमत्तांची नोंदणी करण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. आज नोंदणी करण्याचा शेवटचा दिवस असून अद्यापही लाखो मालमत्तांची नोंदणी झालेली नाही. पुढच्या तीन महिन्यांपर्यंत नोंदणी करणाऱ्यांवर मंत्रालयाकडून कोणताही दंड आकारला जाणार नाही किंवा कठोर कारवाई केली जाणार नसल्याचं आश्वासन रिजिजू यांनी यावेळी दिलं.

<><><><><>

जम्मू काश्मीर पोलिसांनी एका मोठ्या कारवाई अंतर्गत अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत सहा जणांना अटक केली असून त्यांच्याकडून सुमारे ५ किलो हेरॉइन आणि काही शस्त्रं जप्त केली आहेत. जप्त केलेल्या अंमली पदार्थांचं आंतरराष्ट्रीय बाजार मूल्य ३० कोटी रुपयांहून अधिक आहे. या टोळीचे पाकिस्तान मधल्या सुसंघटित

तस्करी मॉड्युलशी लागेबांधे असल्याचं निदर्शनाला आल्याचं जम्मूचे पोलीस अधीक्षक अजय शर्मा यांनी सांगितलं. नियंत्रण रेषेपलीकडून अंमली पदार्थांची तस्करी आणि दहशतवाद यांच्यातल्या वाढत्या संबंधांबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडच्या चंपावत जिल्ह्यात काल रात्री एक वाहन दरीत कोसळून झालेल्या अपघातात ५ जण ठार झाले असून ५ जण जखमी झाले आहेत. जखमींना लोहाघाट इथल्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. उतराखंडच्या पाटी ब्लॉक येथे लग्न समारंभ आटोपून परत येत असताना त्यांचं वाहन बाग धार इथल्या खोल दरीत कोसळून हा अपघात झाला. अपघाताचं वृत्त समजताच स्थानिकांनी तातडीनं मदतकार्य सुरु केलं.

**<><><><><>**

इंडिगो विमान कंपनीची सेवा आजही कोलमडली असून सुमारे ४०० उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. काही विमान उड्डाणं तब्बल दहा ते बारा तासांच्या विलंबानं होत आहेत, यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. अनेक प्रवासी विमानतळांवर खोळंबून विमानांच्या प्रतीक्षेत तासन्तास उभे असल्याचं चित्र आहे. इंडिगो कंपनीकडे सुमारे ४०० विमानांचा ताफा असून दररोज २ हजार ३०० हून अधिक उड्डाणं केली जातात. मात्र गेल्या काही दिवसांपासून वैमानिकांचे वेळापत्रक आणि इतर कारणांमुळे सेवा विस्कळीत झाली आहे. या संदर्भात, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडे अनेक तक्रारी आल्याच्या पार्श्वभूमीवर नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी काल इंडिगोच्या पदाधिकाऱ्यांशी आढावा बैठक घेतली.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु येत्या ९ डिसेंबरला नवी दिल्लीत २०२३ आणि २०२४ या वर्षांचे हातमाग पुरस्कार प्रदान करणार आहेत. वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंंग आणि राज्यमंत्री पबित्रा माार्गेरिटा यावेळी उपस्थित राहणार आहेत. देशातल्या हातमाग उद्योगाचं महत्त्व विषद करण्यासाठी येत्या ८ डिसेंबरपासून हातमाग सप्ताह सुरु होत असून त्या निमित्तानं हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

श्रीलंकेत आलेल्या विनाशकारी दितवाह चक्रीवादळामुळे मरण पावलेल्यांची संख्या ४८६ वर पोहोचली असून अद्याप ३४१ जण बेपत्ता आहेत. आतापर्यंत १ लाख ७१ हजार जणांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं असून देशभरात सुमारे बाराशे बचाव केंद्र स्थापन करण्यात आली आहेत.  दरम्यान ऑपरेशन सागर बंधू अंतर्गत भारत श्रीलंकेला विविध पातळ्यांवर मदत पोहोचवत आहे. भारतीय हवाई दलाच्या हेलीकॉप्टरच्या सहाय्यानं अडकलेल्या लोकांची सुटका करणं, औषधांचा पुरवठा आणि दळणवळण यंत्रणा पुनर्स्थापित करण्यासाठी भारत सातत्यानं मदत करत  आहे.

**//<><><><><>//**